मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि.०३.०५.२०२३ रोजी संपन्न् झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

---

दिनांक ०३/०५/२०२३ रोजी दुपारी ०१.३० वाजता पालघर जिल्हयासाठी निर्यात प्रचालन समिती बैठक मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जिल्हा पालघर येथे मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. सदर बैठकीसाठी खालील प्रमाणे पदाधिकारी उपस्थित होते.

| क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | Shri. Govind Maruti Bodake | Hon'ble Collector, Palghar |
| २ | Shri. Nilesh Bhageshwar | Dist. Agriculture Officer, Palghar |
| ३ | Shri. Dinesh Patil | Assistant Commissioner, Fisheries Dept., Palghar |
| ४ | Shri. Amit Gaikawad | CMI, Railway Palghar |
| ५ | Smt. Dhara Tolia | EY Team, Palghar |
| ६ | Shri. Soni | Station Manager, Palghar |
| ७ | Shri. Pranil Save | Chiku Cluster, Talasari |
| ८ | Shri. Sunil Akrekar | Fish Cluster, Vikramgad |
| ९ | Shri. Yadnesh Save | Chiku Exporter |
| १० | Shri. Devendra Raut | Chiku Exporter |
| ११ | Shri. Sailesh Raut | Chiku Exporter |
| १२ | Shri. Prashant Bhoir | Manager, Vasai Taluka Co-op. Indl. Estate, Vasai. |
| १३ | Shri. Khanvilkar | Chairman, Palghar Taluka Co-op. Indl. Estate, Vasai. |
| १४ | Shri. Gogri | Chairman, TIMA, Boisar. |
| १५ | Shri. Narvekar | Achhad Inustrial Association, Talasari |
| १६ | Shri. Sankhe | Palghar Manufacturer association, Palghar |
| १७ | Smt. V.B. Sone | General Manager, District Inds. Centre, Palghar |

श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी District Export Action Plan यांचे सविस्तर सादरीकरण करुन चर्चा करण्यात आली. पालघर जिल्ह्याकरीता ODOP अंतर्गत चिक्कू उत्पादन व Marine Products हे दोन असल्याबाबत सभेस सांगितले तसेच चिक्कू प्रक्रिया उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत मौजे ब्राम्हणगांव, पोष्ट बोर्डी ता. तलासरी जि. पालघर येथे व मरीन प्रोडक्ट्स उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत ता. विक्रमगड, जिल्हा पालघर येथे सामायिक सुविधा केंद्र स्थापनेचे कामकाज सुरु करण्यांत आले असून या

माध्यमातून उत्पादन व निर्यात वाढीसाठी प्रयत्न होणार असल्याने उद्योजकांनी या वस्तूचे उत्पादनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. याबाबत उपस्थित फिश क्लस्टरच्या सदस्यासोबत मा. अध्यक्षांनी सविस्तर चर्चा केली.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १४.०२.२०२३ रोजीच्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती मध्ये भाडे तत्वावरील रेल्वे स्टॉल आणि किसान रेल्वे या संदर्भात केलेल्या सुचनानुसार सविस्तर प्रस्ताव संबंधित कार्यालयास त्यानुसार दिनांक १३.०३.२०२३ रोजी अग्रेषित केले होते. सदर प्रस्तावाबाबत रेल्वे विभाग व फिश क्लस्टर सदस्य यांच्यात चर्चा झाली. तसेच भाडे तत्वावर देण्यात येणारे रेल्वे स्टॉल १५ दिवसांऐवजी कमीत कमी ३ महिन्यांसाठी देण्यात यावे यासाठी अध्यक्षांमार्फत रेल्वे विभागास मागणी केली. मा.अध्यक्षांनी वारली चित्रकला उत्पादने यासाठी सुध्दा स्टॉल उपलब्ध व्हावे असे सुचविले.

पालघर जिल्ह्याच्या Export Action Plan वर झालेल्या चर्चेअंती पालघर जिल्ह्यातील Iron and Steel Products, Screw & Bolts, Flanges & Stainless Steel, Fastners, House Hold Articles of Stainless steel यांचे सध्याचे निर्यातीतील प्रमाण बघता भविष्यात आणखीन वाढ शक्य आहे ते प्रमाण वाढवण्यासाठी DGFT आणि EEPC यांना प्रचालन कॅम्प आयोजित करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव संबंधित कार्यालयास अग्रेषित करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देशित केले. तसेच Fastners Exporters यांनी प्रदुषण नियंत्रणासाठी Common Effluent Plant असावा अशी मागणी केली. ज्यामार्फत निर्यात वाढ होऊ शकते. सदर Plant साठी MPCB मार्फत योग्य परवानग्या तात्काळ देण्यात याव्यात असे अध्यक्षांनी विभागास निर्देशित केले. तसेच, Power Shortage मुळे उत्पादन वाढिस मर्यादा येतात म्हणून MSEB विभागाने या विषयाकडे तात्काळ लक्ष द्यावे असे अध्यक्षांनी MSEB अधिकाऱ्यांस निर्देशित केले.

औद्योगिक क्षेत्रासाठी मरीन प्रॉडक्टस व कृषी प्रक्रियेंतर्गत चिकू उत्पादन या एक जिल्हा एक उत्पादन या निवड करण्यांत आलेल्या वस्तूंचे उत्पादनासाठी जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात वाव असल्यामुळे उद्योजक/ उत्पादक यांना सदर वस्तूंचे उत्पादन आणि गुणवत्ता वाढिसाठी R&D Centre, Testing Lab ची आवश्यकता आहे. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव Fisheries and Agriculture विभागांनी सादर करावे असे मा. अध्यक्षांना सुचित केले. मा. अध्यक्षांनी सदर बाबींच्या गुंतवणूकीसाठी DPDC मधुन निधी उपलब्ध करुन देऊ असे आश्वासित केले. तसेच, समुद्र किनारी शितगृहे स्थापन करण्यासाठी CRZ नियमांच्या अटी बाबत चर्चा करण्याचे आश्वासन दिले.

शेवटी श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी सदरची बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक, जिउकें पालघर<br>
तथा<br>
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, पालघर.<br>
तथा<br>
मा. अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती

E:\export conclave 2\DEPC-03-05-2023= Export.doc